**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

- **मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा ( भा प्र. से) यांनी शहरातील सखल भागांची व आपत्ती स्थितींची केली पाहणी**

दि. 19 ऑगस्ट 2025 रोजी मिरा भाईंदर मनपा आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा. प्र. से) यांनी शहरातील विविध ठिकाणच्या सखल भागांची व आपत्ती स्थितींची पाहणी करून सर्व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना व सर्व प्रभाग अधिका-यांना सतर्क व सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत.

मिरारोड (पू.) स्मशानभूमी लगत नाला, स्व. इंदिरा गांधी रुग्णालय, रेल्वे समांतर नाला, 22 नं. बस स्टॉप, जाफ्री खाडी, सृष्टी नाला (मिरारोड (पू.)), नवरंग हॉटेल लगतचा परिसर (भाईंदर, प.) व चांद महल नगर (भाईंदर, प.) येथे पाहणी केली. यावेळी आपत्ती व्यवस्थापन दलास स्व. इंदिरा गांधी रुग्णालयातील धोकादायक स्थितीतील खिडक्या तत्काळ काढण्याचे आदेश आयुक्तांनी दिले. याचबरोबर सखल भागातील पाणी निच-याबाबत आढावा घेऊन मनपा अधिकारी, अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांना सतर्क राहण्याचे आदेश दिले व आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून वेळोवेळी शहरातील पावसाच्या स्थितीची माहिती घेत आहेत.

आपत्ती व्यवस्थापन कक्षाद्वारे इंद्रलोक फेज 4 आणि केबिन रोड येथे पडलेली झाडे लगेच कारवाई करत बाजूला करण्यात आली व धोकादायक झाडांच्या फांद्या कापण्यात आल्या. मिरा भाईंदर शहरातील सखल भागातील पाणी निचरा करण्यासाठी एकूण 76 संक्शन पंप लावण्यात आले आहेत.

आपत्तीजन्य स्थितीत तत्काळ मदतीसाठी महानगरपालिकेशी संपर्क करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन कक्ष 24x7 कार्यान्वित आहे. आपत्कालीन संपर्क क्र. - ०२२-२८११७१०२ / ०२२-२८११७१०४ / १८००२२४८४. भ्रमणध्नी क्रमांक - ८२९१३७०१३८ / ८६५७०४७४०२. सुरक्षेच्या दृष्टीने सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

हवामान खात्याच्या अहवालानूसार मिरा भाईंदर शहरात मागील 24 तासात 277 मि.मी. पाऊस पडला असून समुद्रात 3.75 मीटरची भरती असल्याने पाण्याचा निचरा संथ गतीने होत होता. मा. आयुक्त यांच्या सह अति. आयुक्त, उपायुक्त, संबंधित अधिकारी व कर्मचारी पाहणी स्थळावर उपस्थित होते.

पुढील 48 तास ठाणे जिल्हा व मिरा-भाईंदर शहरासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. पुढील दोन दिवस अतिवृष्टीची शक्यता आहे. त्यामुळे आवश्यक नसल्यास घराबाहेर पडू नये. नाले, समुद्रकिनारे व पाणी साचलेल्या भागांपासून दूर रहावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.